R.No. MHHMAR/25/A3029

E-mail : dainikmhavratt@gmail.com

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : २३

दि. ०१ जानेवारी २०२६, वार :गुरुवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

# दैनिक महावृत्त

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## लोकहिताच्या लढ्याचा एक भाग वंचित बहुजन आघाडी, (नमुमनपा) निवडणूक पूर्णताकदीनिशी लढणार..!

नवी मुंबई / के. एच. हनवते :- वंचित बहुजन आघाडी राष्ट्रीय अध्यक्ष : अँड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांचे स्वाभिमानी आणि कणखरनेतृत्व स्वीकारून गेल्या ८ ते१० वर्षापासून नवी मुंबई, बेलापूर विधानसभा या क्षेत्रात भारिप बहुजन महासंघ ते वंचित बहुजन आघाडीत मा. उपाध्यक्ष या पदावर कार्यरत असणारा, बुद्ध, शिवाजी. फुले, शाहू , आंबेडकरांच्या विचारांचा नवी मुंबईचा बुलंद आवाज, स्वाभिमानी बाणा, निर्भीड पत्रकार, बौद्धाचार्य : कल्याणराव हनवते यांनी नवी मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ प्रभाग क्रमांक २३, क नेरूळ मधून वंचित बहुजन आघाडीच्या वतीने कल्याणराव हनवते यांनी दिनांक ३०/ १२ /२०२५ रोजी नामनिर्देशन अर्ज दाखल केला. त्यावेळी संपर्क माध्यमांशी बोलताना कल्याणराव हनवते म्हणाले की, लोकहिताचा एक भाग म्हणून मी नवी मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीच्या रिंगणात (सर्वसाधारण प्र. क्र. २३,क ) मधून उमेदवारी नामनिर्देशन अर्ज भरला असून येत्या काही दिवसातच आम्ही पूर्ण ताकदीनिशी मैदानात उतरुन गल्लो गल्ली वंचित बहुजन आघाडीचा प्रचार आणि प्रसार करणार आहोत, सध्या सर्वत्र या देशात प्रस्थापितांच्या या लढाईत धनशक्ती विरुद्ध जनशक्तीची ही लढाई आहे आणि या लढाईला मी जनशक्तीच्या बळावर सर्व ताकतीनिशी सामोरे जाणार आहे, मी नाही भीत कुणाच्या बापाला मी हातभार लावणार भीम रथाला..! काबीज करो गल्ली तभी तो मिलेगा दिल्ली..! आणि म्हणून वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय नेते प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांनी मला यावेळी उमेदवारी दिली आहे, या संधीचे नक्कीच मी आपल्या प्रभागातील जनतेच्या, लोकहिताचे काम करणार..! असे स्पष्ट आणि प्रखर उद्गार भावी नगरसेवक : कल्याणराव हनवते यांनी काढले. सर्वप्रथम विश्र्वरत्न बुद्ध विहार सेक्टर १८ नेरूळ येथे तथागत भगवान गौतम बुद्ध-आधुनिक भारताचे संविधान निर्माते: परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून नामनिर्देशन अर्ज दाखल केला. वंचित बहुजन आघाडीचा विजयासो..! भीक नको सत्तेची सत्ता हवी हक्काची..!

ऊट बहुजना जागा हो महाराष्ट्राचा राजा हो..!

बहुजन सारे एक होऊ सत्ता आपल्या हाती घेऊ..!!

संविधान के सन्मान में हम सब मैदान मे..! लढेंगे... जितेंगे..!! इत्यादी घोषणा देऊन उमेदवारी अर्ज दाखल केला.




नवी मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५/२६, प्रभाग क्रमांक २३, क मधून कल्याण हनवते यांनी ३० डिसेंबर रोजी नामनिर्देशन अर्ज दाखल केला. व त्यानंतर ३१ डिसेंबर रोजी निवडणूक अधिकारी यांच्या वतीने घेण्यात आलेल्या छाननी प्रक्रियेतून सुद्धा त्यांचा अर्ज वैध असल्याचे घोषित करण्यात आले, या प्रभागात धन दांडगे प्रस्थापितांची सत्ता असून सुद्धा मी या धनशक्ती विरुद्धात जनशक्तीची काय ताकद असते हे दाखवून देणार..! वंचित बहुजन आघाडी चे अधिकृत उमेदवार : कल्याणराव हनवते यांचे प्रस्थापितांना तगडे आव्हान...

## 1 जानेवारी रोजी जन्मलेल्या मुलीच्या नावाने 10 हजार रुपयांची ठेव ठेवणार - हारुणभाई इनामदार



केज/प्रतिनिधी :-केज शहरात दिनांक १ जानेवारी २०२६ रोजी जन्म होणाऱ्या मुलीच्या नावे १० हजार रुपयाची ठेव ठेवण्यात येणार आहे. तरी १ जानेवारी रोजी केज शहरात जन्मलेल्या मुलीच्या पालक व नातेवाईकांनी संपर्क करून नाव नोंदणी करून घ्यावी असे आवाहन केज नगरीच्या नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार यांनी केले आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, दिनांक १ जानेवारी रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा केज नगरपंचायत चे गटनेते व जन विकास फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष आणि जीवन शिक्षण संकुलाचे संस्थापक अध्यक्ष हारूणभाई इनामदार वाढदिवस आहे. त्यानिमित्त १ जानेवारीच्या पूर्व संध्येपासून म्हणजेच रात्री १२-०० पासून ते गुरुवारी रात्री ७-०० वाजेपर्यंत केज शहरांमध्ये जन्माला येणाऱ्या मुलीच्या नावे १० हजार रुपयाची ठेव ठेवण्यात येणार आहे.

दि.१ जानेवारी रोजी हारुणभाई इनामदार यांचा जन्मदिवस आहे, हा जन्मदिवस केज शहरातील व परिसरातील नागरिक विविध उपक्रमानी साजरा करतात आपणही समाजाचे देणे लागतो या भावनेतून हारुणभाई इनामदार यांनी यावर्षी पासुन वाढदिवसाच्या निमित्ताने यावर्षी पासून दि.१ जानेवारी रोजी सर्व जन्मलेल्या मुलींचे नवीन वर्षाच्या निमित्ताने स्वागत करण्याच्या उद्देशाने हा संकल्प करण्यात आलेला आहे. १ जानेवारी च्या दिवशी जन्माला येणाऱ्या मुलीच्या पालकांनी बुधवारच्या मध्यरात्री म्हणजेच रात्री १२ ते गुरुवर रोजी सायं. ठीक ७ वाजेपर्यंत जन्माला येणाऱ्या मुलींची नोंदणी करण्यासाठी ९८९००९००७५,९६६५३३३३०५,९०२८३४९९९९,८८५७९२४२९२ या मोबाईल दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधून नोंदणी करून सदर उपक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन जेष्ठ नेते हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांनी केले आहे. नाव नोंदणी ही गुरुवार रोजी सायंकाळी ठीक ७-०० वाजेपर्यंतच चालू राहील त्यानंतर नोंदणी घेण्यात येणार नाही याची सर्वांनी नोंद घेण्यात यावी. १० हजार रुपये हे मुलीच्या नावाने ठेव ठेवीसाठी देण्यात येणार आहेत या मागील उद्देश हा मुलीच्या जन्मदरामध्ये वाढ व्हावी व मुलींना शिक्षणाकरता फायदा व्हावा.सदरील रक्कम ही रोख स्वरूपात दिली जाणार असुन मुलीच्या शिक्षणासाठी तसेच उपयोग होईल मुलीची प्रगती व्हावी या उदात्त हेतूने हा उपक्रम यावर्षी पासुन राबविण्यात येणार आहे असे हारुणभाई इनामदार यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले आहे.या उपक्रमाचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.



## निवडणुकीच्या प्रशिक्षणास गैरहजर अधिकारी व कर्मचारी यांना नोटीस शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित

लातूर/प्रतिनिधी :- दिनांक २८ डिसेंबर २०२५ रोजी लातूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने मतदान प्रक्रियेतील जबाबदाऱ्या पार पाडणाऱ्या बूथवरील केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांचे अनिवार्य प्रशिक्षण सिद्धेश्र्वर व रत्नेश्र्वर सभागृह येथे आयोजित करण्यात आले होते.

मात्र सदर प्रशिक्षणास दांडी मारणाऱ्या एकूण २६५ अधिकारी व कर्मचारी यांच्यावर निवडणूक नियमांनुसार नोटीस बजावण्यात आली असल्याची माहिती देण्यात आली आहे. नोटीस प्राप्तीनंतर संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून समाधानकारक खुलासा प्राप्त न झाल्यास, शिस्तभंगाची व फौजदारी स्वरूपाची कार्यवाही करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.ही माहिती उपायुक्त (निवडणूक) श्री. पंजाबराव खानसोळे यांनी दिली असून, निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, शिस्तबद्ध व कायदेशीर पद्धतीने पार पडावी यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

### नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!

आमच्या सर्व हितचिंतकांना, जाहिरातदारांना व वाचकांना नवीन वर्ष सुख-समृद्धी, आरोग्य व यश घेऊन येवो, हीच सदिच्छा. आपले प्रेम, विश्र्वास व सहकार्य असेच कायम राहो.

- संपादक









## संपादकीय...

# नवीन वर्षाची सुरुवात चांगली करूया

नवीन वर्षाची पहाट म्हणजे नव्या आशेचा किरण, नव्या संकल्पांची सुरुवात आणि सकारात्मक बदलांची सुवर्णसंधी होय. प्रत्येक नवीन वर्ष आपल्यासमोर एक कोरी पाटी घेऊन उभे राहते. या पाटीवर आपण काय लिहायचे, कोणत्या मूल्यांनी आणि कोणत्या दिशेने आपला प्रवास घडवायचा, हे पूर्णतः आपल्या हातात असते. म्हणूनच नवीन वर्षाची सुरुवात केवळ जल्लोषाने न करता, अंतर्मुख होऊन, जबाबदारीने आणि सकारात्मक विचारांनी करणे अत्यंत गरजेचे आहे.

मागील वर्षाकडे वळून पाहिले तर, प्रत्येकाच्या आयुष्यात चढ–उतार आलेले दिसतात. काहींनी यशाचा आनंद अनुभवला, तर काहींनी अपयशाचे धडे घेतले. मात्र यश आणि अपयश या दोन्ही गोष्टी जीवनप्रवासाचा अविभाज्य भाग आहेत. अपयशामुळे खचून न जाता, त्यातून बोध घेऊन पुढे जाणे हीच खरी शहाणपणाची भूमिका आहे. नवीन वर्ष आपल्याला हीच संधी देते–जुने दुःख, कटुता, राग आणि निराशा मागे टाकून नव्या आत्मविश्र्वासाने पुढे जाण्याची.

आजचा समाज वेगाने बदलत आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाने जीवन अधिक सोयीस्कर केले असले, तरी मानवी नातेसंबंधांतील संवेदनशीलता कमी होत चालली आहे. स्पर्धा, स्वार्थ आणि धावपळीत माणूस माणसापासून दूर जात आहे. अशा काळात, नवीन वर्षात आपण माणुसकी, सहानुभूती आणि सामाजिक बांधिलकी यांना पुन्हा एकदा केंद्रस्थानी ठेवणे आवश्यक आहे. केवळ स्वतःचा विचार न करता, आजूबाजूच्या समाजाकडेही डोळसपणे पाहणे ही काळाची गरज आहे.

देशपातळीवर आणि स्थानिक पातळीवरही अनेक आव्हाने उभी आहेत. शेतकरी, कष्टकरी, युवक, महिला, व्यापारी–प्रत्येक घटक वेगवेगळ्या अडचणींना सामोरे जात आहे. आर्थिक अस्थिरता, बेरोजगारी, शिक्षणातील बदल, आरोग्याच्या समस्या आणि पर्यावरणीय संकटे यांचा थेट परिणाम सामान्य माणसाच्या जीवनावर होत आहे. या सगळ्याचे निराकरण एका रात्रीत होणे शक्य नसले, तरी सकारात्मक दृष्टीकोन, प्रामाणिक प्रयत्न आणि सामूहिक जबाबदारी यातून मार्ग नक्कीच सापडू शकतो.

नवीन वर्षात प्रत्येकाने स्वतःपासून बदलाची सुरुवात करणे गरजेचे आहे. वेळेची शिस्त, कामातील प्रामाणिकपणा, व्यवहारातील पारदर्शकता आणि निर्णयांतील नैतिकता या गोष्टी अंगीकारल्या, तर व्यक्तिगत आयुष्य अधिक सुसंवादी होईल. कुटुंबात प्रेम, संवाद आणि एकमेकांबद्दल आदर राखल्यास घरातील वातावरण आनंदी आणि सुरक्षित राहील.

शिक्षणाच्या बाबतीतही नवीन वर्ष नवे विचार घेऊन यावे. केवळ गुणांच्या मागे धावण्याऐवजी, कौशल्य, संस्कार आणि चिकित्सक विचारसरणी विकसित करण्यावर भर दिला पाहिजे. युवकांनी नव्या संधींचा अभ्यास करून, स्वतःची क्षमता ओळखून, धैर्याने पुढे जाण्याचा निर्धार करावा. अपयश आले तरी हार न मानता, प्रयत्नांची सातत्य राखणे हेच यशाचे खरे गमक आहे.

पर्यावरण रक्षणाचा मुद्दा आता दुर्लक्षित करून चालणार नाही. पाण्याची टंचाई, वाढते प्रदूषण, हवामान बदल याचे दुष्परिणाम आपण अनुभवत आहोत. नवीन वर्षात झाडे लावणे, पाणी वाचवणे, स्वच्छतेची सवय लावणे आणि प्लास्टिकचा वापर कमी करणे हे संकल्प केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात उतरवले गेले पाहिजेत. आज आपण घेतलेली जबाबदारीच उद्याच्या पिढीसाठी सुरक्षित भविष्य घडवेल.

सामाजिक सलोखा टिकवणे हीदेखील आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. मतभेद असू शकतात; परंतु ते द्वेष, हिंसा किंवा तणावात रूपांतरित होऊ नयेत. संवाद, समजूतदारपणा आणि सहकार्य यांच्या माध्यमातूनच सशक्त समाज घडू शकतो. नवीन वर्षात जात, धर्म, भाषा, प्रदेश यापलीकडे जाऊन माणूस म्हणून एकमेकांना स्वीकारण्याचा संकल्प करूया.

नवीन वर्ष म्हणजे केवळ शुभेच्छांची देवाणघेवाण नव्हे, तर त्या शुभेच्छांना अर्थ देणाऱ्या कृती. संकल्प घेताना ते वास्तववादी असावेत आणि त्यांची पूर्तता करण्याची मानसिक तयारीही असावी. मोठे बदल एका क्षणात घडत नाहीत; मात्र सातत्याने केलेले छोटे प्रयत्न नक्कीच मोठे परिणाम घडवतात.

अखेर, नवीन वर्षाची सुरुवात चांगली करणे म्हणजेच आपले विचार, आचार आणि व्यवहार यांना योग्य दिशा देणे होय. वैयक्तिक समाधान, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रीय प्रगती यांचा समतोल साधत पुढे जाणे हेच नवीन वर्षाचे खरे स्वागत ठरेल. चला तर मग, आशा, सकारात्मकता आणि जबाबदारी यांना सोबत घेऊन नवीन वर्षात प्रवेश करूया–कारण आपले आजचे पाऊलच उद्याचा इतिहास घडवणार आहे.

# भीमा कोरेगाव विजय स्तंभ जागेच्या संघर्षाचा त्रिकोण सरकार,पोलीस आणि भिम सैनिक.



पेशवाईचा वैचारिक वारसदार गृहमंत्री,त्याचे सरकार आदेश देणार.पोलीस त्याची अंमलबजावणी करणार आणि भिम सैनिक संघर्ष करणार सध्या आपल्या देशात हेच चालू आहे. त्यात कोणालाच कोणाची सामाजिक बांधिलकी नाही. सर्वच सरकारी खाते हे खाते आहेत. सरकारी कर्मचारी अधिकारी हे राजकीय नेत्यांची गुलामी स्वीकारून देशातील नागरिकांचे आर्थिक शोषण करीत असतात. सरकार म्हणजे कोण राजकीय पक्षांचे सत्ताधारी नेते भांडवलदारांच्या फायद्यासाठी योजना,बिल बनविणार त्यांची अंमलबजावणी कर्मचारी अधिकारी पोलीस करणार. सरकारच्या धोरणाला विरोध कोण करणार?.कामगार, शेतकरी,ग्राहक म्हणजेच नागरिक आणि आम्ही भिम सैनिक मोर्चे आंदोलने करणार पोलीस त्यांच्यावर बळाचा वापर करणार,आणि आदेशाचे पालन करणार. प्रत्येक नेता आणि शासकीय कर्मचारी अधिकारी नागरिकांचे वेगवेगळा पद्धतीने आर्थिक शोषण करणार आणि सांगणार वरून सरकारचा आदेश आहे.आम्ही काय करणार?. सरकारच्या कोणत्याही खात्यात जा चिरीमिरी दिल्या शिवाय काम होत नाही. नाहीतर एक नाही अनेक चुका काढल्या जातात. मग कार्यालयात चकरा माराव्या लागतात. त्यामुळे एक तर रोजगार बुडतो आणि येण्या जाण्याचा प्रवास खर्च चहा पाणी जेवणाचा खर्च हा आलाच.तो करण्यापेक्षा चिरीमिरी देणेच सोयीस्कर परवडते.हाच सर्व नागरिकांना सरकारी खात्याचा अनुभव आला असेल. म्हणूनच सरकारी खाते हे खातेच असते.त्यांचे मालक सरकारी कर्मचारी अधिकारी असतात.

एकटा दुकटा नागरिक संघर्ष करू शकत नाही.पण एक भिम सैनिक मात्र परिणामाची पर्वा न करता संघर्ष करण्यासाठी नेहमीच उभा राहतो आणि बघता बघता हजारो भिम सैनिक त्याला गांव ते तालुका जिल्हा म्हणजेच राज्यभर समर्थन देण्यासाठी उभे राहतात.मग ते एकाची समस्या राहत नाही तर समाजाची समस्या होते.मग त्याला समाजाचे चळवळीचे आंदोलन नांव दिल्या जाते.त्यासाठी प्रत्येक खात्यातील लाभार्थीची एकजूट म्हणजेच संघटना असायला पाहिजे. आणि ती कोणत्याही राजकीय पक्षाच्या दबावाखाली नसावी.स्वतंत्र विचारांची असावी.

भीमा कोरेगाव च्या विजय स्तंभा वरील जागेची,जमिनीची अशीच लढाई सुरू आहे.ती कोण्या एक आजच्या दादाभाऊ अभंग ची किंवा पूर्वीच्या सुदाम पवार ची नव्हती.पण राजकीय पक्षाच्या गटबाजी,दलाली व लाचारीमुळे ती वेळोवेळी फुटबॉल सारखी उडविला गेली आहे.१८१८ ते १९२७ पर्यंत ती कोणाला माहिती नव्हती.विश्र्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी तो शोधून काढला तेव्हा पासून त्यांना मानणारा भिमसैनिक,अनुयायी दरवर्षी हजारो च्या संख्येने भीमा कोरेगाव विजय स्तंभावर येत आहे.१८१८ ते २०१८ ला २०० वर्ष पूर्ण झाले नंतर भीमा कोरगाव चा इतिहास १ जानेवारी २०१८ ला मनोहर भिडे यांच्या जगदंब जॉकीट घातलेल्या गांडु तरुणांनी शेतात लपून दगड फेक करून जो जीवघेणा कसा हल्ला लोकावर केला आणि पोलिस प्रशासन काय करत होते हा लिहला गेला.

महानगरपालिका,राज्य सरकार आणि पोलिस सर्वच मागासवर्गीय अधिकारी कर्मचारी असतात.मग एकजुठीने एक मताने कोणते ही काम होत नाही.ज्यांनी आवाज उचलला त्याला चिरीमिरी देऊन आवाज बंद केल्या जातो.यावर माझे आणि माझ्या वकील मुलाचे नेहमीच वाद विवाद होत असतात. एवढे जिगरबाज कार्यकर्ते नेते असतांना योग्य त्या प्रमाणे नियोजन का होत नाही. सर्वच अधिकारी भ्रष्ट नाही किंवा कार्यकर्ते नेते भ्रष्ट नाहीत. पण तडजोडीचे राजकारण इमानदार अधिकारी कर्मचारी कार्यकर्ते नेते यांना करावे लागते.त्यांचे उत्तम उदाहरण म्हणजे दादर परिसरात बॅनर बाजी करणाऱ्या आणि स्टॉल लावणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांचे नेत्यांचे देता येईल.अनेक स्टॉलवर एकवेळ भोजन,बिस्किट,काही साहित्य वाटून फक्त उद्घाटन करून फोटो काढल्या जातात.नंतर त्यात काहीच होत नाही. असा लोकांना एवढी बॅनरबाजी करण्याची गरज का पडते?.यासाठी यांचे उद्योग धंदे उत्पन्नाचे साधने आहेत काय?.मग यासाठी लागणारा खर्च कुठून येतो.याचे सरळ उत्तर आहे.अधिकारी आणि ठेकेदाराकडून हे बॅनरबाजी करून घेतली जाते. त्याबदल्यात कागदावर नकाशा द्वारे दाखविलेलं जाते.त्या विरोधात बोलायचे नाही.

संघर्षाचा त्रिकोण सरकार,पोलीस आणि भिम सैनिक.

मी भीमा कोरेगाव ला दरवर्षी चार दिवस अगोदर जाऊन येतो.नियोजन कसे आहे. संबधित कार्यकर्ते नेते,अधिकारी यांच्या बरोबर चर्चा करून माहिती घेतो.कारण मागितल्याने मिळत नाही आणि संघर्षा शिवाय पर्याय नाही संघटीत होऊन संघर्ष केला तर यशस्वी होता येतो. म्हणूनच संघर्षाचा त्रिकोण सरकार,पोलीस आणि भिम सैनिक संघर्ष पत्र व्यवहार करून टाळावा.नसेल तर शक्ती प्रदर्शन आवश्यक आहेच.

कोरेगाव भीमा विजयस्तंभ व विजयस्तंभ परिसरातील पावणे दहा एकर जागेवर माळवदकर कुटुंबाचा ताबा आहे.सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने प्रत्येक वर्षी मुंबई उच्च न्यायालयाची परवानगी घ्यावी लागते. किती लोकांना हे माहित आहे?. ९९.९९% लोकांना माहित नाही व ज्यांना माहिती आहे ते मौन धारण करून गप्प बसले आहेत त्यांना कुणाची भीती आहे ते माहित नाही. कोरेगाव भीमा विजयस्तंभ व विजयस्तंभ परिसरातील पावणे दहा एकर जागेवर केवळ एक दिवस विजय उत्सव साजरा करण्याची परवानगी मिळते व पुन्हा विजयस्तंभासह जागेचा ताबा माळवदकर कुटुंबाकडे जातो.वर्षभर हे कुटुंब जमिनीच्या मधून शेतीचे उत्पन्न घेते.या विरोधात मागील पंधरा वर्षे प्रशासकीय व न्यायालयीन लढा दादाभाऊ अभंग यांच्या नेतृत्वाखाली भीमा कोरेगाव विजयस्तंभ संरक्षण व संवर्धन समिती लढत असून अनेक निकाल या समितीच्या बाजूने लागले आहेत.अनेक वेळा या न्यायालयीन लढ्यात सामील व्हा असे आवाहन केले तर त्याकडे कोणी गांभीर्याने लक्ष देत नाही.

लाखों लोक एक दिवस या विजयस्तंभाला मानवंदना देण्यासाठी येतात आणि नंतर ऐतिहासिक विजयस्तंभाकडे दुर्लक्ष करतात.हा विजयस्तंभ व त्या परिसरातील जागा आपल्याला जर ताब्यात घ्यायची असेल तर प्रशासकीय व न्यायालयीन लढा सर्वांनी सर्व मतभेद बाजूला ठेवून एकत्रितपणे लढला पाहिजे व यासाठी आपण भीमा कोरेगाव विजयस्तंभाचे अतिक्रमण तसेच सध्याची न्यायालय स्थिती काय आहे हे तालुक्यात, शहरात आणि प्रत्येक जिल्ह्यात समजून सांगितली पाहिजे असे दादाभाऊ अभंग सांगतात.यासाठी कोरेगाव भीमा जयस्तंभ बचाव समिती या समितीच्या माध्यमातून जनजागृती अभियान दादाभाऊ अभंग व सहकारी राबवत असतात.एक दिवस महारांच्या शौर्यची दाखल घेतली जाते.त्यात भीमा कोरेगाव संघर्षाचा त्रिकोण सरकार,पोलीस आणि भिम सैनिक थांबत नाही.

कोरेगाव भीमा विजयस्तंभ हा आपल्या सर्वांसाठी आस्थेचा श्रद्धेचा प्रेरणादायी लक्षवेधी भावनिक आहे. देशभरातून लाखों लोक दरवर्षी अनेक वर्षांपासून विजय स्तंभाला मानवंदना देण्यासाठी भीमा कोरेगाव ला येत असतात.त्यांना कोणी आमंत्रण निमंत्रण देत नाही. त्यासाठी कोणते ही हँडबिल,पोस्टर काढल्या जात नाही.इथे पिण्याचे पाणी मिळेल काय यांची कोणी अपेक्षा सुद्धा ठेवत नाही.पिण्याचे पाणी जेवण सर्व सोयीने लोक येत असतात. शासनाकडून कोणती सुविधा मिळावी अशी कोणती ही अपेक्षा न ठेवता लाखों लोक आपल्या सोयीने आणि हिंमतीने भीमा कोरेगावला येतात.

२०१८ ला दोनशे वर्ष झाले म्हणून लोक आले असता १ जानेवारी २०१८ ला मनोहर भिडे यांच्या जगदंब जॉकीट घातलेल्या गांडु तरुणांनी शेतात लपून दगड फेक करून जो जीवघेणा हल्ला लोकावर केला होता. त्या नंतर ३ जानेवारी २०१८ ला महाराष्ट्र बंद पाडला होता. त्यांची दखल जागतिक पातळीवरील चॅनल मिडियाने घेतली. सोशल मिडियामुळे भीमा कोरेगाव चा इतिहास घरा घरात पोचला बहुसंख्य मराठा,ओबीसी यांना हा इतिहास माहिती नव्हता.ते पण आता भीमा कोरेगाव ला मोठ्या संख्येने येत आहेत. ती संख्या बघून आता सर्वांचे डोळे फिरत आहेत.पेशवा सरकार त्यांना २०१८ झाली रोखण्यास असमर्थ ठरले म्हणूनच आता ते नवीन पद्धतीने रोखणीचे षड्यंत्र करीत आहेत.ते म्हणजे पांच सात किलोमीटर वर गाडी पार्किंग करण्याचे व्यवस्था. त्यामुळे वयोवृद्ध जेष्ट भिम सैनिक महिला या त्रासाला वैतागून येणे टाळतील अशी अपेक्षा पेशवा सरकारची आणि अधिकारी वर्गाची मानसिकता झाली आहे.त्यांच्या आदेशाचे पालन अधिकाऱ्यांना करावी लागत आहे.इतिहास वाचला की इतिहास घडविता येतो भीमा कोरेगाव हा असाच संग्राम आहे. १८१८ पेशवाईचा झालेला पराभव आज पेशवाईचा राजकीय वैचारिक वारसा सांगणाऱ्यांच्या जिवारी लागत आहे. मग ते विजय स्तंभाला निधी उपलब्ध करून देतील ही अपेक्षा चुकीची आहे.संविधान असे सांगते की एखाद्याला आधार देताना असा आधार द्यावा की,त्याला त्याची 'जाणीव' ही होऊ नये,आणि.'उणीव' ही राहू नये !.

विजयस्तंभ परिसरातून ३७ वर्षाची परंपरा असलेल्या अभिवादन सभा चार वर्षांपूर्वी २०१८ ला बाहेर काढल्या व आत्ता मानवंदना रॅलीने त्रास होतो असे सांगून आंबेडकरी जनतेच्या रॅली बंद करण्याचा डाव पेशवा सरकार अधिकाऱ्यांच्या खांद्यावर बंदूक ठेऊन खेळत आहे. पारंपारिक मानवंदना व अभिवादनाची सभा परंपरा मोडीत काढण्याचा आपल्याच काही बांधवांचा हाताशी धरून हा प्रयत्न केल्या गेला होता.परंतु आंबेडकरी जनतेला हे काही नवीन नाही.आपसात किती ही मतभेद असले तरी लोक मान अपमान बाजूला ठेऊन दीक्षाभूमी नागपूर,चैत्याभूमी दादर मुंबई,चवदार तळे महाड आणि विजय स्तंभ भीमा कोरेगाव ला लाखों च्या संख्येने येत असतात.व एक साथ मानवंदना देतात.कायदा सुव्यवस्था ठेवण्याच्या नांवाखाली दरवर्षी मनुवादी मानसिकता असणारे राज्यकर्ते आणि प्रशासकीय अधिकारी यांना कसा त्रास देऊन रोखता येईल यांचेच नियोजन करीत असतात. त्याला साथ देण्यासाठी दर पांच वर्षाने नवीन कार्यकर्ते नेते तयार केले जातात. जूने अनुभवी मागे पडतात.असे मला २००७ ला भीमा कोरेगाव विजय स्तंभाची सुरवात करणारे आंबेडकरी चळवळीतील जेष्ट नेते सुदाम पवार यांनी मुलाखत देतांना सांगितले होते. विजय स्तंभाची जागा बाजूच्या शेत जमीन वरील अतिक्रमन यांच्या विरोधात सनद शिर मार्गाने पत्रव्यवहार आणि रस्त्यावरील संघर्षाची सुरवात त्यांनी केली होती.सणसवाडीला तालुका शिरूर जिल्हा पुणे येथे त्यांचे निवास स्थान आणि बुद्धिस्ट मुवहमेन्ट मुव्ह मेंट सेंटर (ट्रस्ट) संचालित नालंदा बुद्ध विहार आहे.तिथे नियमितपणे धम्म शिबिर सामाजिक कार्यक्रम होत असतात.आणि हजारो लोक तिथे दरवर्षी भोजन दान घेतात. जिवावर उद्धार होऊन त्यांनी अनेक जन आंदोलन केली आहेत.त्यांचे योगदान कधीच विसरता येणार नाही.

विजय स्तंभाची जागा बाजूच्या शेत जमीन वरील अतिक्रमन यांच्या विरोधात सनद शिर मार्गाने पत्रव्यवहार आणि रस्त्यावरील संघर्षाची सुरवात त्यांनी केली होती. राजकीय पक्षाच्या गटबाजी,दलाली व लाचारीमुळे ती वेळोवेळी फुटबॉल सारखी उडविला जात आहे.५०० महार सैनिकांची एकजुट होऊन २८००० हजार पेशवा सैनिकांच्या विरोधात जो संघर्ष केला आणि विजय मिळविला त्याचा कोणता आदर्श भीमा कोरेगाव ला येणारे घेतात हा प्रश्र्न मला दरवर्षी पडतो.त्या वर मी दरवर्षी हे लिहतो. आपसातली गटबाजी मी मोठा की तू मोठा ही संपत नाही. म्हणूनच भीमा कोरेगाव विजय स्तंभाच्या जमिनीचा कोर्टाने दिलेला आदेश त्याची अंमलबजावणी करतांना अनेक अडचणी निर्माण केल्या जातात. डिसेंबर जानेवारीत सर्वांच्या अंगातील रक्त भीमा कोरेगाव मध्ये लढलेल्या महरांचे होते. बाकीच्या वेळी तिथे काय चालले त्यांना काही घेणे देणे नसते.म्हणूनच भीमा कोरेगाव संघर्षाचा त्रिकोण सरकार,पोलीस आणि भिम सैनिक हा थांबत नाही. भीमा कोरेगाव विजय स्तंभाला मानवंदना देण्यासाठी येणाऱ्या प्रत्येकानी याचे आत्मचिंतन करावे हीच सर्वांना कळकळीची विनंती.इतिहास वाचला तर इतिहास घडविता मग आज,आता आम्ही काय करतो?.भीमा कोरेगाव संघर्षातील ज्ञात अज्ञात शहिदांना मानाचा मुजरा.

**सागर रामभाऊ तायडे,**
**९९२०४०३८५९,**
**भांडूप मुंबई.**

# २० वर्षांपूर्वी 'गांजा तपासणी'च्या बहाण्याने खिशातील रक्कम चोरणारा आरोपी अखेर गजाआड. लातूर पोलिसांच्या विशेष पथकाची उल्लेखनीय कामगिरी

लातूर :- लातूर पोलीस दलाच्या विशेष पथकाने तब्बल २० वर्षांपूर्वी घडलेल्या चोरीच्या गुन्ह्यातील फरार आरोपीस अटक करून न्यायालयीन प्रक्रियेसमोर उभे केले असून, ही कारवाई लातूर पोलिसांच्या सातत्यपूर्ण व चिकाटीच्या तपासाचे उत्तम उदाहरण ठरली आहे.

सदर प्रकरण आरसीसी नं. ६१३/२००६, डारमंड फाईल नं. १२०/२०१८ तसेच पोलीस स्टेशन गांधी चौक गु.र.नं. २५६/२००५, कलम ३७९, ३४ भा.दं.वि. अन्वये दाखल आहे. या गुन्ह्यातील आरोपी नामे राजेंद्र ऊर्फ राजू निवृत्ती बनसोडे (वय ५४ वर्षे), रा. प्रकाशनगर, लातूर, सध्या रा. विकासनगर, लातूर हा गेल्या २० वर्षांपासून फरार होता.

फिर्यादी सोमनाथ शामराव मुळे, रा. तेर, ता. व जि. उस्मानाबाद हे दि. २५/०२/२००५ रोजी तेरणा इंजिनिअरिंग महाविद्यालयात बी.ई. (आयटी) फायनल इयरचे शिक्षण घेत असताना, मोटार खरेदीसाठी लागणाऱ्या सबमर्सिबल मोटारीचे साहित्य खरेदी करण्यासाठी लातूर येथे आले होते. त्यांनी सोबत १०,०००/- रुपये आणले होते. खरेदी केल्यानंतर उरलेली रक्कम व दुकानांच्या पावत्या त्यांनी पॅन्टच्या खिशात ठेवलेल्या होत्या.

रात्री अंदाजे ०८.०० वाजण्याच्या सुमारास, मध्यवर्ती बसस्थानक, लातूर येथे एस.टी. डी. कॉईन बॉक्सवरून फोन करून बाजूला जात असताना, दोन अनोळखी इसम त्यांच्याजवळ आले व तुझ्या खिशात गांजा आहे, तपासणी करू दे असे सांगून, फिर्यादीच्या पॅन्टच्या खिशातील ४५०/- रुपये व खरेदीच्या पावत्या जबरदस्तीने काढून घेतल्या.



फिर्यादीने आरडाओरड करताच बसस्थानकावरील पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप करून एका आरोपीस पकडले व त्याच्याकडून ४५०/- रुपये व पावत्या जप्त केल्या. त्यावरून पोलीस स्टेशन गांधी चौक येथे गु.र.नं. २५६/२००५, कलम ३७९, ३४ भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र, सदर गुन्ह्यातील मुख्य आरोपी सतत आपले वास्तव्य बदलत असल्याने तो पोलिसांच्या हाती लागत नव्हता.

अपर पोलीस अधीक्षक यांच्या विशेष पथकास गोपनीय माहिती प्राप्त झाली की, सदर आरोपी सध्या विकासनगर, लातूर येथे वास्तव्य करत आहे. ही माहिती तात्काळ वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळविण्यात आली. त्यानंतर विशेष पथकाने नियोजनपूर्वक कारवाई करत, आरोपी राजेंद्र ऊर्फ राजू निवृत्ती बनसोडे यास त्याच्या राहत्या घरातून ताब्यात घेतले. आरोपीची अटकपूर्व वैद्यकीय तपासणी करून त्यास पोलीस स्टेशन गांधी चौक येथे आवश्यक रिपोर्टसह हजर करण्यात आले आहे.

ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश चव्हाण तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर शहर श्री. समीरसिंह साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली लातूर पोलिसांच्या विशेष पथकातील सपोनि शिवशंकर मनाळे, पोलीस उपनिरीक्षक संजय भोसले,

पोलीस अमलदार दत्तात्रय शिंदे, योगेश गायकवाड, श्रीकांत कुंभार यांनी सदर उल्लेखनीय कामगिरी बजावली.

२० वर्षांनंतरही गुन्हेगाराला शोधून काढत कायद्याच्या कचाट्यात आणणे, हे लातूर पोलिसांच्या कार्यक्षमतेचे, तांत्रिक तपासाचे व चिकाटीचे जिवंत उदाहरण आहे. कायद्यापासून कोणीही कायमचा सुटू शकत नाही, हा ठाम संदेश या कारवाईतून पुन्हा एकदा समाजास देण्यात आला आहे.

## स्थापत्य अभियंता अनंत पाटील यांना 'वास्तु विशारद' पदवी प्रदान

लातूर :- येथील सुप्रसिद्ध स्थापत्य अभियंता अनंत शिवाजीराव पाटील यांना वास्तु विशारद ही मानाची पदवी पुणे येथील *ज्योतिष वास्तु विश्र्व संशोधन केंद्र* या संस्थेच्या वतीने नुकतीच प्रदान करण्यात आली.



ज्योतिष वास्तु विश्र्व संशोधन केंद्र, पुणे यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या वास्तुशास्त्र विषयक परीक्षेत अनंत पाटील यांनी विशेष श्रेणीत यश संपादन केले. गेल्या वीस वर्षांपासून ते लातूर शहरासह परिसरात वास्तुशास्त्रानुसार घरबांधणीचे नकाशे, मार्गदर्शन तसेच बांधकाम निर्मितीचे कार्य सातत्याने करीत आहेत.

त्यांच्या स्थापत्य कौशल्यातून आजपर्यंत शेकडो आकर्षक व शास्त्रशुद्ध वास्तू साकार झाल्या असून त्यांनी वास्तुशास्त्रासोबतच अंकशास्त्र या विषयातही विशेष प्राविण्य मिळवले आहे. त्यांच्या कार्यामुळे अनेक कुटुंबांना वास्तुशास्त्राच्या दृष्टीने योग्य आणि समाधानकारक घरे लाभली आहेत.

या उल्लेखनीय यशाबद्दल स्थापत्य अभियांत्रिकी क्षेत्रातील अभियंते, बांधकाम व्यवसायिक, निर्माते, कामगार तसेच नागरिकांकडून अनंत पाटील यांचे अभिनंदन व कौतुक होत आहे.

## आंदोलनाचा इशारा देताच प्रशासन झाले जागे ;कार्यवाही करण्याची प्रक्रिया चालू झाल्यामुळे आंदोलन तात्पुरते स्थगित

केज/प्रतिनिधी–केज दि.३१/१२/२०२५ रोजी




तालुक्यातील चिंचोली माळी येथील ग्रामीण मार्ग १२३ वर सरपंच पती यांनी अनधिकृत खोदकाम केल्यामुळे उप अभियंता जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग केज यांच्या यांच्याकडे चिंचोली माळी ग्रामस्थांनी लेखी तक्रार करून संबंधितावर कार्यवाही करण्याची मागणी केली असता उप अभियंता जिल्हा परिषद बांधकाम विभाग हे यांनी एक समिती स्थापन करून चौकशी केली. चौकशी समितीने चौकशी करून अहवाल कार्यालयाला दिनांक ११/११/२०२५ रोजी सादर केला परंतु अहवाल सादर होऊनही अनेक दिवस कोणाच्यातरी दबावापोटी सरपंच पती यांच्यावर कुठलीही कार्यवाही न केल्यामुळे संतप्त गावकऱ्यांनी उप.अभियंता यांच्या दालनामध्ये बोंब मारो आंदोलन करण्याचे निवेदन देताच उप.अभियंता जिल्हा परिषद बांधकाम विभाग केज यांनी तात्काळ सरपंच पती यांना तीन दिवसाच्या आत खुलासा द्यावा असे पत्र काढले आहे. व आंदोलकांना त्या पत्राची एक प्रत देऊन आंदोलन हे स्थगित करण्याची विनंती करण्यात आली सदर विनंती वरून आंदोलकांनी सदरचे आंदोलन हे तात्पुरत्या स्वरूपात मागे घेतले आहे व अधिकाऱ्यांच्या लेखी आश्र्वासन आणि त्यांच्या विनंतीला मान देऊन आंदोलनकर्त्यांनी आंदोलन पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु संबंधितावर लवकरात लवकर योग्य ती कार्यवाही न झाल्यास हे आंदोलन पुन्हा करण्यात येईल असेही गावकऱ्यांनी सांगितले आहे.

## पैठण येथे मराठवाडा ग्रंथालय संघाचे ५0 वे वार्षिक अधिवेशन पालकमंत्री संजय सिरसाट यांच्या हस्ते होणार उद्घाटन

लातूर :- शासन मान्य मराठवाडा ग्रंथालय संघाचे ५० वे तर छत्रपती संभाजीनगर जिल्हा ग्रंथालय संघाचे ४७ वे संयुक्त वार्षिक सोमवार,दिनांक ५ जानेवारी २०२६ रोजी नाथ मंदिर परिसर पैठण येथे होणार आहे.या अधिवेशनाचे उद्घाटन पालकमंत्री संजय सिरसाट यांच्या हस्ते, आ.विलास भूमरे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. लातूर जिल्ह्यातील ग्रंथालय पदाधिकारी व कर्मचार्यांनी या अधिवेशनास उपस्थित राहावे असे आवाहन लातूर जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाने केले आहे.

सदर वार्षिक अधिवेशनात ग्रंथदिंडी,चर्चासत्र,समारोप/ठराव वाचन/खुले अधिवेशन हे सत्र राहणार आहेत. सकाळी ९ वाजता धाराशिव जिल्हा ग्रंथालय संघाचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर सूर्यवंशी महाराज, महाराष्ट्र वारकरी प्रबोधन सेवा मंडळाचे जिल्हाध्यक्ष सुधाकर वाघ महाराज आणि वारकरी शिक्षण संस्थेचे बद्रीनाथ नवल महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत ग्रंथदिंडी निघणार आहे.

त्यानंतर होणार्या उद्घाटन सत्राला प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून मंत्री अतुल सावे, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ. गजानन कोटेवार,राज्याचे ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर,खा.डॉ.कल्याण काळे, खा.संदीपान भूमरे,आ.सतीष चव्हाण, आ.विक्रम काळे,पैठणच्या नगराध्यक्षा विद्या कावसानकर, देवगिरी नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे,महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे माजी अध्यक्ष गंगाधर पटणे, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ. गजानन कोटेवार,स्वारातीम विद्यापीठ सिनेट सदस्य प्राचार्य रामेश्वर पवार, सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे, मराठवाडा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष खंडेराव सरनाईक, ग्रंथालय भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.राजेश्वर बालेकर, एसएनडीटी विद्यापीठाचे संचालक



डॉ.सुभाष चव्हाण हे लाभणार आहेत.या प्रसंगी देवगिरी नागरी सहकारी बँक व कॉ. सी.डी.चौधरी पुरस्कार वितरण होणार आहे.

दुपारी १.३० ते २.३० दरम्यान बालसाहित्य व सार्वजनिक ग्रंथालयाचा बालविभाग सक्षम कसा करता येईल?या विषयावर,प्रकाशक बाबा भांड यांच्या अध्यक्षतेखाली पहिले चर्चासत्र होणार असून,बालसाहित्यिक सुनिता कावसानकर व साहित्यिक विलास वैद्य हे प्रमुख वक्ते लाभणार आहेत, यात ग्रंथालय परिषदेचे सदस्य सुनील वायाळ, प्रा.नामदेव दळवी, सुभाष सोळंके, डी.बी.देशपांडे, जीवन लोखंडे, सुधीर चाटे,वसंतराव सूर्यवंशी, प्रभाकर कापसे हे सहभागी होणार आहेत. सूत्रसंचालन गुलाबराव मगर तर आभार प्रदर्शन साईनाथ जाधव हे करतील.

दुपारी २.३० ते ३.३० दरम्यान सार्वजनिक ग्रंथालयाच्या बाबतीत शासनाची भूमिका आणि अपेक्षा या विषयावर सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे यांच्या अध्यक्षतेखाली दुसरे चर्चासत्र होईल.यावेळी प्रमुख पाहुणे छत्रपती संभाजी नगरचे जिल्हा ग्रंथालय अधिकारी संतोष जाधव हे राहणार आहेत.यामध्ये छत्रपती संभाजी नगर जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुभाष साबळे, नांदेड जिल्हा ग्रंथालय अधिकारी अनिल सूर्यवंशी, हिंगोली जिल्हा ग्रंथालय अधिकारी आशिष ढोक, लातूर जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर, बीड जिल्हा ग्रंथालय अधिकारी संजय म्हस्के,जालना जिल्हा ग्रंथालय अधिकारी चंद्रशेखर ठाकूर, धाराशिव जिल्हा ग्रंथालय अधिकारी हनुमान ढाकणे, परभणी जिल्हा ग्रंथालय अधिकारी बाळासाहेब देवणे व सहाय्य ग्रंथालय संचालक कार्यालयातील अधीक्षक अनिल बावीस्कर हे सहभागी होणार आहेत. सूत्रसंचालन निर्मलकुमार सूर्यवंशी तर आभार प्रदर्शन अरविंद लंके पाटील हे करतील.

सायंकाळी ४ वाजता खुले अधिवेशन मराठवाडा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष खंडेराव सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. यावेळी मराठवाडा ग्रंथालय संघाचे प्रमुख कार्यवाह राम मेकले, अरविंद लंकेपाटील, गुलाबराव मगर, विष्णू बोडखे, संतोष ससे, राजेंद्र हंबीरे, राजेंद्र सानप,देविदास जिगे, युवराज जाधव, साईनाथ जाधव, गिरीधारी कदम, नरहरी मंठेकर, सुरेश जोशी हे सहभागी होतील.

तरी लातूर जिल्ह्यातील सार्वजनिक ग्रंथालय चालक व ग्रंथालयीन कर्मचार्यांच्या प्रत्येकी एक सदस्यांनी या विभागीय अधिवेशनाला जास्तीत तास्त संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन लातूर जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाच्या पदाधिकार्यांनी केले आहे.

## निक्षय मित्र बनुया, लातूर जिल्हा क्षयरोगमुक्त करु या!

### प्रत्येक ग्रामपंचायतींनी क्षयरुग्णांचे सामाजिक दायित्व घेण्याचे आवाहन

लातूर :- सध्या भारतात प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियान अंतर्गत केंद्र सरकरने क्षयरोगमुक्त भारत करण्यासाठी क्षयरोगाचे उच्चाटनाचे नियोजन केलेले आहे. लातूर जिल्ह्यामध्ये ४ लाख अतिजोखीम गटातील व्यक्तींची नोंदणी करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने नोंदणी करण्यात आलेल्या सर्व अतिजोखीम गटातील व्यक्तींचे एक्सरे तपासणी, बेडका तपासणी करण्यात येणार आहे.

सततचा खोकला, खोकल्यातून रक्त पडणे, छातीत दुखणे, वजन घटणे, भुक मंदावणे, रात्री घाम येणे, ताप येणे, अशक्तपणा आणि थकवा जाणवणे, श्र्वास घेण्यास त्रास होणे, मानेवर किंवा काखेत गाठी येणे, आवाजात बदल होणे ही क्षयरोगाची लक्षणे आहेत.

सद्यास्थितीत जिल्ह्यात १ हजार ८८२ क्षयरुग्ण उपचार घेत आहेत. त्यापैकी ३६५ रुग्णांना पोषण आहार किट पुरविले आहेत. अद्याप १ हजार ५१७ क्षयरुग्ण प्रतिक्षेत असून जिल्ह्यातिल उपचारावर असलेल्या क्षयरुग्णांना निक्षय मित्र बनून वैयक्तिक, संस्था, लोकप्रतिनिधी, उद्योजक व औद्योगिक क्षेत्रातील प्रतिनिधी व सीएसआरच्या माध्यमातून पोषण आहार किट देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. तसेच जिल्ह्यात टीबीमुक्त ग्रामपंचायत अभियान सुरु असून त्याअनुषंगाने ग्रामपंचायत स्तरावरुन लोकसहभागातून क्षयरुग्णांना पोषण आहार किट देवून सामाजिक दायित्व निभवावे, असे आवाहन लातूर येथील जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांनी केले आहे.

पोषण आहार किटबाबातचा तपशिल

तांदुळ, गहू, ज्वारी– ३ किलो
डाळ–१.५ किलो
खाद्यतेल– १ किलो
दूध पावडर– १ किलो,
दूध–६ लिटर,
शेंगदाणे–१ किलो.

पोषण आहार किटसाठी खालीलप्रमाणे १ हजार ५१७ क्षयरुग्ण प्रतिक्षेत आहेत–शिरूर अनंतपाळ–१४, देवणी–२२, रेणापूर –२४, लातूर ग्रामीण–२५,चाकूर– ४४, जळकोट –४५, औसा–६३, निलंगा–६५, अहमदपूर–९७, उदगीर–३१४, लातूर शहर–८०४.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १0, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर – ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर – ४१३५१२ येथे प्रकाशित केले.